पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.महिला व बालकल्याण समिती ( विशेष सभा )**

कार्यपत्रिका क्रमांक - १

**सभावृत्तांत**

दिनांक - **१०/०५/२०१८** वेळ – सकाळी **११.३०** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीची पहिली सभा (विशेष सभा) गुरुवार दिनांक **१०/०५/२०१८** रोजी सकाळी **११.३०** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस **मा.श्री.मिलीन्द शंभरकर, (भा.प्र.से.)** आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे व खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.कुटे निर्मला संजय
२. मा.स्वीनल कपिल म्हेत्रे

या शिवाय मा.स्मिता झगडे – सहा. आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.बोदडे – सहा.आयुक्त, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**मा.पिठासीन प्राधिकारी तथा – आयुक्त, समाज कल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे** सन्मा.सदस्य, उपस्थित सर्व अधिकारी यांचे स्वागत करतो. आजच्या विशेष सभेत मा.महिला व बालकल्याण समितीचे **सभापती** पदावर नेमणूक करणेचा विषय आहे. त्यासाठी मा.विभागीय आयुक्त यांनी सभेचा पिठासीन प्राधिकारी म्हणून माझी या ठिकाणी नेमणुक केलेली आहे.

मुक्त व निर्भयपणे मा. महिला व बालकल्याण समितीच्या **सभापती** पदाची निवडणुक पार पाडण्यासाठी कामकाजाची लेखी नोंद घेण्याबरोबरच त्या कामकाजाची व्हिडिओ चित्रणाद्वारे देखील नोंद घेण्याची व्यवस्था ठेवणेत आलेली आहे.

**मी नगरसचिव यांना सभेचे कामकाज सुरु करण्याचे आदेश देतो.**

**मा.नगरसचिव -** मा. महिला व बालकल्याण समितीचे **सभापती** पदावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ३० (३) नुसार नेमणूक करणे.

मा.महिला व बालकल्याण समिती **सभापती** पदाकरीता मुदतीत दाखल झालेले एका उमेदवाराचे नामनिर्देशनपत्र मा.पिठासीन प्राधिकारी यांचेकडे छाननी करणे कामी सुपुर्त करण्यात येत आहे.

**- आता छाननीची कार्यवाही करणेत येईल –**

| | |
|---|---|
| **मा.पिठासीन प्राधिकारी तथा आयुक्त, समाज कल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे** | - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या **सभापती**, महिला व बालकल्याण समिती पदाकरीता एक नामनिर्देशनपत्र मुदतीत दाखल झाले आहे. त्यामध्ये उमेदवार त्यांचे सुचक, अनुमोदक यांची नावे पुढील प्रमाणे आहेत. |

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव | सुचकाचे नांव | अनुमोदकाचे नांव |
|---|---|---|---|
| **०१** | **मा.स्वीनल कपिल म्हेत्रे** | **मा.चौंधे आरती सुरेश** | **मा.मुंढे उषा अंकुश** |

मा.सभापती, महिला व बालकल्याण समिती या पदासाठी मुदतीत प्राप्त झालेल्या उपरोक्त एक नामनिर्देशन पत्राची छाननी करणेत आली असून सदर नामनिर्देशन पत्र परिपूर्ण आहे. त्यावर उमेदवाराचे नाव, पत्ता, प्रभाग क्रमांक नमुद आहे तसेच नामनिर्देशन पत्रावर उमेदवाराची स्वाक्षरी आहे. त्याचप्रमाणे नामनिर्देशन पत्रावर समितीच्या एका सदस्याने सुचक म्हणून स्वाक्षरी केली आहे आणि दुस-या सदस्याने अनुमोदक म्हणून स्वाक्षरी केली आहे. सबब सदरचे नामनिर्देशनपत्र वैध असून स्विकृत करण्यात येत आहे.

त्यामध्ये मा.महिला व बालकल्याण समिती सभापती पदाची निवडणूक लढविणा-या **मा.स्वीनल कपिल म्हेत्रे** या एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत.

**- नामनिर्देशनपत्र माघारी घेणे –**

उमेदवारास १५ मिनिटांच्या आत त्यांनी सही केलेली लेखी नोटीस मा.पिठासीन प्राधिकारी यांजकडे देऊन त्यांची उमेदवारी मागे घेता येईल अशी नियमात तरतूद आहे. उमेदवारी मागे घेण्यासाठी १५ मिनिटांचा ( सकाळी ११.४० ते ११.५५ वा.) कालावधी देणेत येत आहे.

**- उमदेवार निवडून आल्याची घोषणा –**

नामनिर्देशनपत्र माघारी घेण्याचा कालावधी संपला आहे. या कालावधीमध्ये उमेदवाराने उमेदवारी मागे घेतली नाही. सबब मा.सभापती, महिला व बालकल्याण समिती पदाची निवडणूक लढविणा-या **मा.स्वीनल कपिल म्हेत्रे** या एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत.

यास्तव **मा.स्वीनल कपिल म्हेत्रे** यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समितीचे **सभापती** पदावर रितसर वैधरित्या बिनविरोध निवड झाल्याचे मी मिलीन्द शंभरकर, पिठासीन प्राधिकारी, महिला व बालकल्याण समिती (विशेष सभा) जाहीर करतो.

----------

ठराव क्रमांक - १ विषय क्रमांक – १

दिनांक - १०/०५/२०१८ विभाग – नगरसचिव

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समिती **सभापती** पदासाठी मुदतीत दाखल झालेल्या व वैध ठरलेल्या एका नामनिर्देशन पत्रामधील मा.महिला व बालकल्याण समिती **सभापती** पदाची निवडणूक लढविणा-या **मा.स्वीनल कपिल म्हेत्रे** या एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार असल्याने **मा.स्वीनल कपिल म्हेत्रे** यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समितीचे **सभापती** पदावर रितसर वैधरित्या बिनविरोध निवड झाल्याचे जाहिर करणेत येत आहे.

---------

**(मिलीन्द शंभरकर, भा.प्र.से.)**
पिठासीन प्राधिकारी तथा
आयुक्त, समाज कल्याण,
महाराष्ट्र राज्य, पुणे
महिला व बालकल्याण समिती
(विशेष सभा)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

----------

( नवनिर्वाचित सभापती **मा.स्वीनल कपिल म्हेत्रे** यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्विकारले. )

मा.नगरसचिव - विषय क्र.२ - मा.महिला व बालकल्याण समिती उपसभापतीची नेमणूक करणे.

(मा.महिला व बालकल्याण समितीचे उपसभापती पदासाठी एकही नामनिर्देशनपत्र मुदतीत दाखल झालेले नाही.)

----------

ठराव क्रमांक - ०२ विषय क्रमांक - ०२
दिनांक - १०/०५/२०१८ विभाग – नगरसचिव
सुचक : मा.स्वीनल म्हेत्रे अनुमोदक : मा.निर्मला कुटे

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीच्या **उपसभापती** पदासाठी एकही नामनिर्देशनपत्र मुदतीत दाखल झालेले नसल्याने मा.महिला व बालकल्याण समितीच्या **उपसभापतीची** नेमणूक मा.सभापती निश्चित करतील त्या विशेष सभेत करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ०३ विषय क्रमांक - ०३
दिनांक – १०/०५/२०१८ विभाग – नगरसचिव
सुचक : मा.स्वीनल म्हेत्रे अनुमोदक : मा.निर्मला कुटे

मा.महिला व बालकल्याण समितीची सभा प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिस-या मंगळवारी दुपारी ३.०० वा. विशेष समिती सभागृहात भरविण्यात यावी. तथापी सदर दिवशी कार्यालयास सुट्टी/सुट्टया असलेस त्या सुट्टी/सुट्टयांनंतर येणारे कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी दुपारी ३.०० वा. सभा भरविण्यात यावी. तसेच कोणीही सन्मा.सदस्य उपस्थित नसल्याने होऊ न शकणारी सभा मा.सभापती निश्चित करतील त्या दिवशी व त्या वेळी भरविण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(स्वीनल कपिल म्हेत्रे)**
**सभापती**
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/२६३/२०१८
दिनांक : १०/०५/२०१८



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

Z:\e drive\Nagersachiv1\New Folder\Ele 2018-19 sub committee sabhapati.doc